जास्त होत असलेल्या किंवा १०० मीटरपेक्षा जास्त उंचीवर
पाणी न्यावे लागणा-या ग्रामीण पाणी पुरवठा यो जनांना
लोकवर्गणी माफ करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांक ग्रापायो-१२०८/प्र.क्र.१२८/पापु-०७

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक १६ जूले,२०१२

**वाचा:** १.शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापायो-१२०८/प्र.क्र.१६/पापु -०७,दि.१८/८/२००८

२. शासन परिपत्रक, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापाधो -१११०/प्र.क.१४१/पापु-०७, दि.१/७/ २०१०

३. शासन शुध्दिपत्रक, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापाधो-१११०/प्र.क्र.१४१/पापु-०७, दि.१२/११/२०१०

**प्रस्तावना:** संदर्भ क्र.१ येथिल शासन निर्णयान्वये पाणी गुणवत्ता बाधित गावे /वाड्या तसेच अन्य गावे / वाड्या जेथे नव्याने पाणी पुरवठा योजनेची आखणी करताना, जवळपास पिण्याच्या पाण्याचे सुरक्षित व खात्रीचे उद्‌भव उपलब्ध न झाल्याने त्यांना ३ किलोमीटर व त्यापेक्षा जास्त अंतरावरील उद्‌भव निवडावे लागतात किंवा विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीमुळे ज्या योजनांसाठी १०० मीटर पेक्षा जास्त उंचीवर पाणी उचलावे लागणार असेल, अशा योजनांच्या बाबतीत संबंधित गावे / वाड्यांवरील लोकवर्गणीचा भार कमी करण्यासाठी त्यांना योजनेची उद्‌भवापासून साठवण टाकीपर्यंतची पाईपलाईन, ब्रेक प्रेशर टँक, पंपीग मशिनरी इ.वरील खर्चावरील लोकवर्गणी माफ करण्यासाठी प्रधान सचिव (पा.पु.व स्व.वि) यांच्या अध्यक्षतेखाली शासन स्तरावर समिती गठित करण्यात आली आहे.

२. दि.१८/८/२००८ च्या शासन निर्णयान्वये ३ कि.मी. पेक्षा लांबीच्या उपांगासाठीच्या लोकवर्गणी मागणीबाबत पुरेशी स्पष्टता होत नसल्यामुळे संदर्भ क्र.२ येथिल दि.१/७/२०१० च्या शासन निर्णयान्वये याबाबत स्वयंस्पष्ट सूचना निर्गमित करण्यात आल्या. संदर्भ क्र.३ येथिल दि.१२/११/२०१० च्या शुद्धिपत्रकान्वये हा निर्णय दि. १८/८/२००८ नंतर प्रशासकीय मान्यता मिळालेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच लागू असल्याबाबत स्पष्टिकरण देण्यात आले.

आंशिक बदल करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय-** संदर्भ क्र.१ येथिल शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीच्या रचनेत खालीलप्रमाणे आंशिक बदल करण्यात येत आहे-

| | |
|---|---|
| प्रधान सचिव | अध्यक्ष |
| सह /उप सचिव (पापु-०७) | सदस्य |
| संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे | सदस्य |
| सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी | सदस्य सचिव |

४. मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी हे राज्यस्तरीय समितीचे सदस्य सचिव असल्यामुळे ३ कि.मी.पेक्षा जास्त अंतरावर उद्भव असलेल्या अथवा १०० मिटर पेक्षा जास्त उंचीवर पाणी न्यावे लागणार असणा-या ग्रामीण पाणी पुरठवा योजनांना (स्वतंत्र व प्रादेशिक) लोकवर्गणी माफ करण्याबाबत जिल्हा परिषदांकडून अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून शासनास प्राप्त होणारे प्रस्ताव राज्यस्तरीय समितीच्या विचारार्थ ठेवण्याची कार्यवाही तसेच समितीच्या निर्णयानुसार पुढील योग्य ती कार्यवाही मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी यांच्या अधिपत्याखालील संबंधित कार्यासनांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शैला ए.)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,

मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव

विभागीय आयुक्त (सर्व)